RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक ३१] गुरुवार, ऑगस्ट ६, २०२६/ श्रावण १५, शके १९४८ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ७१**

## प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

## कामगार विभाग

मंत्रालय विस्तार, कक्ष क्र. १२३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ ऑगस्ट, २०२६.

**अधिसूचना**

**कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२.**

क्रमांक ईपीएफ-२०२६/प्र.क्र.१७/कामगार-४.—ज्याअर्थी, कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ च्या कलम १७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये शासन अधिसूचना, कामगार विभाग, क्र. ईपीएफ/११५९/१५५०१६-Lab-I, दिनांक १८ ऑगस्ट, १९६० द्वारे महाराष्ट्र शासनाने मे. द बॉम्बे ऑइल इंडस्ट्रीज प्रा. लि., ४११, शाह अँड नहार औद्योगिक वसाहत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी नाका, मुंबई ४०० ०१८ (MH/THA/९०९) यांस त्या अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींच्या अधीन राहून कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी योजना, १९५२ च्या तरतुदींच्या प्रवर्तनातून दि. १.०८.१९५६ पासुन सूट दिलेली होती;

आणि ज्याअर्थी, संबंधित आस्थापनेने दिनांक ८ मे, २०१५ पासून सदर सूट स्वेच्छेने समर्पित करण्याबाबत ठराव मंजूर केला असून, सदस्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या सर्व शिल्लक रकमा कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी संघटनेकडे वर्ग केलेल्या आहेत. तसेच, केंद्रीय विश्वस्त मंडळाच्या शिफारशीनुसार केंद्रीय भविष्य निर्वाहनिधी आयुक्त यांनी सदर आस्थापनेस देण्यात आलेली सूट रद्द करण्याची शिफारस केली आहे.

त्याअर्थी, आता, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ च्या कलम १७ च्या पोट-कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, मे. द बॉम्बे ऑइल इंडस्ट्रीज प्रा. लि. , ४११, शाह अँड नहार औद्योगिक वसाहत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी नाका, मुंबई ४०० ०१८(MH/THA/९०९) यांस कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी योजना, १९५२ च्या प्रवर्तनातून देण्यात आलेली सूट दिनांक ०८ मे २०१५ रोजीपासून पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिपक पोकळे,**
शासनाचे उप सचिव.

## LABOUR DEPARTMENT

Mantralaya Annexe, Room No. 123, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400032, dated the 6th August, 2026.

*NOTIFICATION*

EMPLOYEES' PROVIDENT FUNDS AND MISCELLANEOUS PROVISIONS ACT, 1952.

No. EPF-2026/C.R.17/Labour-4.—Whereas, by Government Notification, Labour Department, No. EPF/1159/155016-Lab-I, dated the 18th August, 1960, issued under clause (*a*) of sub-section (*1*) of section 17 of the Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 (19 of 1952), the Government of Maharashtra had exempted M/s. The Bombay Oil Industries Pvt. Ltd., 411, Shah & Nahar (Worli) Industrial Estate,Dr. E.Moses Road, Worli Naka, Mumbai 400 018 (MH/THA/909) from the operation of the Employees' Provident Fund Scheme, 1952 with the effect of 1st August 1956 subject to the conditions specified in the Schedule annexed to the said Notification ;

And whereas, the said establishment has passed a resolution to voluntarily surrender the said exemption with effect from the 8th May, 2015, and the entire accumulated provident fund balances of the members have been transferred to the Employees' Provident Fund Organisation. Further, on the recommendation of the Central Board of Trustees, the Central Provident Fund Commissioner has recommended cancellation of the exemption granted to the said establishment.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*4*) of section 17 of the Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 (19 of 1952), the Government of Maharashtra hereby cancels the exemption granted to M/s. The Bombay Oil Industries Pvt. Ltd., 411, Shah & Nahar (Worli) Industrial Estate, Dr. E. Moses Road, Worli Naka, Mumbai 400 018 (MH/THA/909) with retrospective effect from 8th May 2015.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPAK POKALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.